नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/११/२०२६ (मंगळवार)

अवैध अंमली पदार्थाच्या गुन्हयातील सराईत आरोपी रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा याला PITNDPS अधिनियमांतर्गत केले स्थानबध्द
नागपूर ग्रामीण पोलीसांची प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारास आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत अवैध अंमली पदार्थाच्या गुन्हयातील सराईत आरोपी रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा, वय ३५ वर्षे, रा. येरला ता. कळमेश्वर जि. नागपुर याच्याविरुद्ध अंमली पदार्थ व मन:प्रभावी पदार्थांच्या अवैध वाहतुकीस प्रतिबंध करणारा अधिनियम, १९८८ (PREVENTION OF ILLICIT TRAFFIC IN NARCOTIC DRUGS AND PSYCHOTROPIC SUBSTANCES ACT, 1988) - PITNDPS Act च्या कलम ३(१) अन्वये कारवाई करून स्थानबद्ध करण्यात आले आहे.

नागपुर ग्रामीण पोलीसांनी नमुद आरोपी विरुद्ध पीटएनडीपीएस १९८८ च्या कलम ३(१) अन्वये अन्वये प्रस्ताव तयार करून मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाने सदर प्रस्तावाला मंजुरी देवुन दिनांक ०३/११/२०२६ रोजी सदर स्थानबद्धता आदेश पारित केला.

दिनांक १४/१०/२०२५ रोजी खापा पोलीस ठाणे, नागपूर ग्रामीण गु.र.क्र. ६०४/२०२५, कलम ८(सी), २०(बी) (ii) (सी), २९ एनडीपीएस अधिनियम, सहकलम

३(१) (ii), ३(२), ३(४) मोक्का अधिनियम अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस स्टेशन खापा हद्दीत मौजा हनुमान घाट, गडेवालपुरा, खापा येथे एक महीला आरोपी आणि तिचा मुलगा अरोपी नामे ईश्वर गणपती पराते यांच्यावर कारवाई करत यांच्या घराची झडती घेवुन पंचासमक्ष १.५०५ किलो ग्रॅम गांजा किंमती ३०,१६०/—रूपये, लोखंडी वजन काटा, दोन मोबाईल आणि रोख रक्कम १४००/— रूपये असा एकुण ४४,०६०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला. नमुद गुन्हयात पोलीसांनी सखोल तपास करीत साखळी पुरावे जोडुन आरोपी नामे **रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा, वय ३५ वर्षे, वार्ड क्र १ येरला, कळमेश्वर हा गांजा पुरवित असल्याचे निष्पन्न केले.**

सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान नमुद आरोपीचा सहभाग असुन तो संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख तसेच अंमली पदार्थ पुरवठादार असल्याचे तपासातून निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध मोक्का (MCOCA)अधिनियमाच्या अन्वये कारवाई करण्यात आली होती. तसेच नमुद आरोपीविरुद्ध यापूर्वी मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये सहा महिन्यांसाठी हद्दपार तसेच एमपीडीए अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली होती.

नमुद आरोपी रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा, वय ३५ वर्षे, वार्ड क्र १ येरला, कळमेश्वर याच्याविरुद्ध सन २०२२ पासून आजपावेतो एनडीपीएस कयादयान्वये एकूण ०४ गुन्हे दाखल आहेत.१) हुडकेश्वर पोलीस ठाणे, नागपूर शहर गु.र.क्र. २१२/२०२२, कलम ८(सी),२० (बी) (ii) (सी), २९ एनडीपीएस अधिनियम. **२) खापरखेडा पोलीस स्टेशन** गु.र.क्र. ३०५/२०२५ कलम ८(सी),२०(बी) (ii) (ए) एनडीपीएस अधिनियम**,३) कळमेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण गु.र.क्र. ३७०/२०२५, कलम ८(सी),२०(बी) (ii) (ए), २९ एनडीपीएस अधिनियम.**४) खापा पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण गु.र.क्र. **६०४/२०२५, कलम ८(सी), २०(बी) (ii) (सी), २९ एनडीपीएस अधिनियम, सहकलम ३(१) (ii), ३(२), ३(४) मोक्का अधिनियम** अन्वये एकुण **०४ गुन्हे** दाखल आहे.

नमुद प्रतिबंधात्मक कारवायांनंतरही आरोपीचा अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारातील सहभाग सुरू तसेच त्याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवल्याचे निदर्शनास आले. आरोपीची सातत्यपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्ती, अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारातील सहभाग, संघटित

गुन्हेगारीशी असलेला संबंध तसेच समाजाच्या सुरक्षिततेस निर्माण होणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन त्याच्याविरुद्ध **PITNDPS** अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असुन त्याला स्थानबध्द करण्यात आले आहे.



रामेश्वर उर्फ गोलु देवशंकर वर्मा

बनावट कागदपत्रे तयार करून शेतकऱ्यांच्या नावावर भारतीय स्टेट बॅंकेमधून ७३ कोटी ८२ लाख ९२ हजार ८५० रुपयांचे कृषी कर्ज घेवून फसवणुक करणाऱ्या आंतरराज्यीय ३ अरोपीस अटक, नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती पुजा गायकवाड, पोलीस उपअधीक्षक ,आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्याचे सखोल विश्लेषण करून SBI मौदा आणि रामटेक येथून गरिब, अल्पशिक्षीत शेतकऱ्यांचे नावाने बनावट व खोटे कागदपत्रे तयार करुन करोडो रुपयांचे कृषी कर्ज उचल करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील ३ आरोपींना अटक केले आहे. दिनांक ०१/११/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री योगेश कामाले, आर्थिक गुन्हें

शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी क्र १) नामे डॉ मदन गोपाल मल्लीकार्जुन पाटील याला बेंगलुरू शहरातुन ताब्यात घेतले. तसेच दिनांक ०३/११/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने ,प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात पोलीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २) प्रियरंजन अशोक कुमार चौधरी उर्फ गौरव मिश्रा उर्फ गौरव जयस्वाल आणि ३) राहुल उर्फ संदीप सतीश दुबे यांना नक्षत्र नगर, जबलपूर मध्यप्रदेश येथुन ताब्यात घेतले.

सदर गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, नमुद टोळीतील सदस्य गरिब, अशिक्षीत आणि अल्पशिक्षीत शेतकऱ्यांना हेरुन शेती पिकांच्या नुकसान भरपाईसाठी शासनाकडून प्रतिवर्ष १०,०००/—.रुपये मोबदला मिळते, त्यासाठी SBI बॅकेत खाते उघडावे लागते असे सांगुन विश्वास संपादन करायचे आणि शेतकऱ्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, ७/१२ उतारे मिळवून SBI बॅकेत शेतकऱ्यांना घेवून जात होते. बॅकेतील वेगवेगळया इंग्रजी भाषेतील कागदपत्रांवर शेतकऱ्यांच्या सहया घेवून त्यांचे नावावर लाखो रुपयांचे कृषी कर्ज उचल करायचे. या आरोपींच्या टोळींनी SBI बॅक मौदा येथून ५४,६९,४२,८५०/—रुपये आणि SBI बॅक रामटेक येथून १९,१३,५०,०००/—रुपयांचे कृषी कर्ज उचल केले व बनावट कंपन्या स्थापन करुन कर्ज रक्कम त्या कंपन्यांमध्ये ट्रान्सफर करुन उचल केली आहे. वरील प्रकरणांमध्ये पोलीस ठाणे मौदा व रामटेक येथे आतापर्यंत एकुण १८ आरोपीतांविरुध्द विवीध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये सदर गुन्हयाचे तपास आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांना दिले होते.

या प्रकरणातील बहुतांश आरोपी हे विविध राज्यातील असल्याचे तपासामध्ये समोर आले आहे. पोलीस सर्व आरोपींचा शोध कसोशिने घेत आहे. आरोपी हे नियोजनबध्द पध्दतीने केंद्रीय प्राधिकरण वेअरहाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्यूलेशन अथॉरेटी, दिल्ली (WDRA) यांचेकडून बनावट वेअरहाऊस परवाने मिळवित होते आणि त्या परवान्यांचे आधारे SBI बॅके मध्ये खोटे व बनावट इलेक्ट्रॉनिक निगोशिएबल वेअर हाऊस रिसीट्स (eNWR) तारण ठेवून**''प्रोडयूस मार्केटींग लोन''** (PML) या योजनेमध्ये करोडों रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांचे नावे उचल करीत असल्याचे पोलीस तपासामध्ये समोर आले आहे.

यापुर्वी आर्थीक गुन्हे शाखेने सदर गुन्हयात आरोपी नामे **सचिन कारेमोरे याला अटक केले असुन सदर गुन्हयाचा सखोल तपास करून आरोपी क्रं १) डॉ मदन गोपाल मल्लीकार्जुन पाटील, वय २६ वर्षे,रा ब्रिडगे मिडोज, कनकपुरा रोड, बेंगलुरू, २) प्रियरंजन अशोक कुमार चौधरी उर्फ गौरव मिश्रा उर्फ गौरव जयस्वाल, वय ४२ वर्ष, राहणार बाराद्वारी मोहल्ला जमशेदपूर, जिल्हा सिंग भूम, राज्य झारखंड ह/मु. लिंगराज नगर विद्यानगर ३२ क्रॉस रोड, व्ही एस वस्ताद हाऊस नंबर २९ सेकंड फ्लोअर हुगली, ह/मु. नक्षत्र नगर, स्टार सिटी, जैन मंदिर जवळ, जबलपूर, मध्यप्रदेश आणि आरोपी क्र ३) राहुल उर्फ संदीप सतीश दुबे, वय ३७ वर्षे, रा. खरपुरिया तहसील पाटण जिल्हा जबलपूर, मध्यप्रदेश यांना अटक केले आहे.**

यातील प्रियरंजन अशोक कुमार चौधरी उर्फ गौरव मिश्रा उर्फ गौरव जयस्वाल याचे वर कर्नाटक राज्यात याच प्रकारच्या फसवणुकीचे अनेक गुन्हे नोंद आहेत.

खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजीवन कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन देवलापार :— फिर्यादी रमाबाई मोहन मेश्राम रा. हिवराबाजार यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन देवालापार येथे अप. क्र. ३५ /२१, ३०२ ,३२६,५०६ ३४ भा. द. वि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, मृतक व आरोपी यांची घरे समोरासमोर असून, आरोपी अश्विन अशोक बागडे, वय ३१ वर्षे, रा. हिवराबाजार याचे घराचे बांधकाम सुरू असल्याने दिनांक १२/०३/२०२१ रोजी बांधकामकरीता लागणारी गिट्टी टाकल्याने मृतक विश्वास मोहन मेश्राम, वय ३५ वर्षे याने आरोपीला हटकले असता आरोपीने मृतकासोबत वाद करून शिवीगाळ केली. तसेच काठी व लोखंडी सब्बलने विश्वास याच्या डोक्यावर वार करून त्यास गंभीर जखमी केले. जखमी विश्वास यास पुढील उपचारासाठी मेडिकल कॉलेज, नागपूर येथे दाखल केले उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाला.

तपासी अधिकारी श्री प्रविण बोरकुटे, सहा पोलीस निरीक्षक, देवलापार यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक ०३/११/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्र. १४ श्री बी. एम. धानुरे यांनी नमुद आरोपी अश्विन अशोक बागडे यास कलम ३०२ भादवि मध्ये आजीवन कारावास व ५०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री राजेश श्यामसुंदर यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे , प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन देवलापार ,सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री गणेश भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण तसेच पोहवा इम्रान शेख ,ब.नं १९९० पैरवी अधिकारी, देवलपार पोलीस स्टेशन यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

विनापरवाना **Dicyclomine HCl Tramadol** कॅप्सूलचा साठा व विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद; १ आरोपी अटक
०१ लाख ०८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त ,कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन.एम. सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्या नेतृत्वात अंमली पदार्थविरोधी मोहिमेंतर्गत कन्हान पोलीस यांनी कारवाई करत Dicyclomine HCl Tramadol या (Psychotropic) औषधयुक्त गुंगीकारक कॅप्सूलचा अवैधरित्या विनापरवाना साठा करून त्यांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. या कारवाईत एकूण १,०८,८००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक ०३/११/२०२६ रोजी कन्हान पोलीस हे अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने माहीती दिली की, **राजेंद्र नामदेवराव हटवार, वय ५८ वर्ष, रा. रामनगर (गणेशनगर) तिवाडे ले आऊट, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर हा राजेंद्र मेडीकल, आंबेडकर चौक कन्हान येथे व आपल्या राहत्या घरी रामनगर (गणेशनगर) कन्हान येथे विनापरवाना Pyeevon Spas Plus या ब्रँडच्या Dicyclomine HCl, Tramadol असलेल्या गुंगीकारक कॅप्सूलचा साठा करून त्यांची ग्राहकांना विक्री करीत आहे.** कन्हान पोलीसांनी सदर वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनात सापळा रचुन कारवाई करत **औषध निरीक्षक यांच्यासह** आरोपी **राजेंद्र नामदेवराव हटवारच्या राहत्या घरी छापा टाकला. सदर घर झडतीदरम्यान ३७ बॉक्स मध्ये Dicyclomine HCl, Tramadol असलेल्या Pyeevon Spas Plus एकूण ८८८० कॅप्सूल (एकूण वजन ४४४० ग्रॅम किंमत ८८,८००/— रुपये, ०१ ॲडरॉईड मोबाईल किंमती २०,०००/—रूपये, असा एकूण १,०८,८००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

या प्रकरणी आरोपीविरुद्ध कन्हान पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस कायदयाअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. साखळी पुरावे जोडुन नागपुर ग्रामीण पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत आहेत.

पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक ०२/११/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, मच्छी मार्केट च्या बाजूला कन्हान न्यु मार्केट येथे अभिषेक यशंवत रोडगे हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता मच्छी मार्केटच्या बाजूला कन्हान न्यु मार्केट येथे **आरोपी अभिषेक यशंवत रोडगे, वय ३४ वर्ष, रा. नया नगर राणी तलाव कामठी, जि. नागपूर** हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम २१९०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य असा एकुण २१९५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपी अभिषेक यशंवत रोडगे, वय ३४ वर्ष, रा. नया नगर राणी तलाव कामठी, जि. नागपूर याच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अवैध दारू विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०४ गुन्हे दाखल,

दिनांक ०२/११/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची विक्री, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०४ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपी नामे अजय विजय नितनवरे, वय ४४ वर्ष, रा. केरडी, ता. पारशिवनी याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) जयकपुर छोटेलाल उईके, वय ३० वर्ष, रा. सावलाना ठाणा बाग्यघया ता. परासीया छिंदवाडा म. प्र.,

ह. मु एनटीपीसी शिवार २) कमलेश इकबाल बाकदे, वय ३० वर्ष, रा. घोघरी, ता. अमरवाडा छिंदवाडा म. प्र. ह. मु. एनटीपीसी शिवार ३) मनोज देवचंद तिरपुडे, वय ४९ वर्ष, रा. लापका रोड, ता. मौदा, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण १८०० मिली देशी दारू असा एकुण ८००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६८४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०३/११/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६८४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

नागपुर उपविभाग :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ८८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

उमरेड उपविभाग :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २३ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

सावनेर उपविभाग :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १७ आरोपी, अशा एकुण १४९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

कन्हान उपविभाग :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे १९ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १७ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

रामटेक उपविभाग :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

काटोल उपविभाग :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४६ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.







जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर